# पोलीस कोठडीतून सराईताचे पलायन

## मित्राची मदत; भद्रकाली पोलिसांकडून ताब्यात

**नाशिक | प्रतिनिधी**

प्राणघातक हल्ल्याच्या गुन्ह्यात अटक केलेल्या सराईताने मंगळवारी (दि. २९) सायंकाळी अंमलदाराच्या हाताला हिसका देऊन भद्रकाली पोलीस ठाण्यातून धूम ठोकली. या गंभीर प्रकारानंतर त्याचा शोध सुरु असताना पळून जाण्यासाठी मदत करणाऱ्या त्याच्या मित्रास ताब्यात घेतल्यावर पोलिसांना आवश्यक माहिती मिळाली. यानंतर तांत्रिक विश्लेषणानुसार, भद्रकाली गुन्हेशोध पथकाने ४० किलोमीटर परिसर पिंजून काढत संशयित क्रिश किरण शिंदे(वय १९, रा. ५४ क्वॉर्टर्स, नानावली, जुने नाशिक) याला घटनेनंतर २४ तासांच्या आत इगतपुरीतून ताब्यात घेतले. शिंदे हा सराईत असून त्याच्यावर प्राणघातक हल्ल्याचे दोनहून अधिक गुन्हे नोंद आहेत. दरम्यान, याबाबत कर्तव्यात निष्काळजीपणा केल्याने संबंधित पोलिसांवर कारवाई होण्याची शक्यता आहे.

काठे गल्लीतील जयशंकर चौकातील संगम स्विट्सजवळ रविवारी (दि. २७) रात्री ८ वाजता अमोल हिरवे याच्यावर अज्ञातांनी जीवे ठार मारण्याचे उद्देशाने दगडाने व कोयत्याने हल्ला करून गंभीर जखमी केले होते. त्याबाबत भद्रकाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, झोन एकचे उपायुक्त किरणकुमार चव्हाण, सहायक आयुक्त नितीन जाधव व भद्रकाली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक गजेंद्र पाटील, पोलीस निरीक्षक विक्रम मोहिते यांच्या सूचनेने वरील गुन्ह्यातीस मारेकरी संशयित क्रिश व त्याच्या विधिसंघर्षित मित्रास गुन्हे शोध पथकाचे सहायक निरीक्षक सत्यवान पवार व पथकाने (दि. २८) ताब्यात घेऊन किशला अटक केली होती. या गुन्ह्याच्या पोलीस कोठडीदरम्यान किश शिंदेला तपासकामी कोठडी बाहेर काढले असता त्याने अंमलदार तौसिफ नियाज सय्यद यांच्या हाताला झटका देऊन पोलीस स्टेशनबाहेर उभा असलेला मित्र किरण युवराज परदेशी(रा. कथडा) याच्या मोपेडवर बसून पळ काढला. पथकाने सीसीटीव्ही फूटेज पडताळून परदेशीला ताब्यात घेतले. तेव्हा त्याने क्रिश शिंदेला रात्री आडगाव शिवारातील निलगिरी बागेत सोडल्याचे सांगितले. त्यानंतर तो कुठे गेला, याची माहिती नसल्याचे सांगितले. दरम्यान, पथकाने क्रिशचा ठावठिकाणा नसतांना मानवी कौशल्य व तांत्रिक तपास करुन २४ तासांच्या आत इगतपुरी शिवारातून ताब्यात घेतले. तपास पोलीस निरीक्षक विक्रम मोहिते करीत आहेत. ही कारवाई हवालदार सतिष साळुंके, कय्यूम सय्यद, लक्ष्मण ठेपणे, अविनाश जुंद्रे, अंमलदार धनंजय हासे, जावेद शेख, गुरू गांगुर्डे, सागर निकुंभ, योगेश माळी, उत्तम खरपडे यांनी केली.



### त्या गुन्ह्यातही वॉन्टेड

२४ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास पुणे रोडवरील घंटी म्हसोबा मंदिरामागील प्रो- चिकन दुकानासमोरील रोडवर हर्षल राजेंद्र देवरे याच्यावर संशयित लखन काशीद, क्रिश शिंदे व त्यांच्या सहा साथीदारांनी ठार मारण्यासाठी धारदार शस्त्रांनी हल्ला करुन गंभीर दुखापत केली होती. त्यावरून उपनगर पोलीस ठाण्यात २५ एप्रिल २०२५ रोजी अतिविलंबाने गुन्हा दाखल आहे होता. दरम्यान, या गुन्ह्यात मुख्य सराईत शुभम हरगावकरला ताब्यात घेण्यात आले असून क्रिष शिंदे याचाही सहभाग असल्याचे समोर आले आहे.

# पत्नीला अद्दल घडवण्यासाठी मुलाचा खून

## नशेत कृत्य; दिव्यांग मूल हत्याप्रकरणी खुलासा

**नाशिक | प्रतिनिधी**

मुलांना सासरी ठेऊन माहेरी गेलेल्या पत्नीस अद्दल घडवण्यासाठी पतीने मद्याच्या नशेत दिव्यांग मुलाचा खून केल्याचे उपनगर पोलिसांच्या तपासात उघड झाले आहे. दरम्यान, या क्रूर पित्यास अटक झाली असून न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावली आहे. जेलरोड परिसरात मंगळवारी(दि. २९) दुपारी संशयित सुमीत भारत पुजारी(वय ३५ रा. सोहम् अपार्टमेंट, भोगे हॉस्पिटलजवळ, मंगलमूर्तीनगर) याने आठ वर्षांचा दिव्यांग मुलगा गणेश याची गळा दाबून हत्या केल्याचे मंगळवारी(दि. २९) दुपारी उघडकीस आले होते. त्यामुळे परिसरात खळबळ उडाली होती. याबाबत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मंगळवारी दुपारी तीन वाजेच्या दरम्यान संशयित सुमीतने राहत्या घरी मद्याच्या नशेत आठ वर्षाचा मुलगा गणेश याचा गळा दाबून खून केला. त्यानंतर मृतदेह पोत्यात घालून सासू व पत्नी ज्या ठिकाणी राहते त्या जेलरोड येथील आम्रपाली झोपडपट्टीतील सासूच्या घरात नेऊन टाकला. यानंतर तो पळून गेला. दरम्यान गोणीतील नातवाचा मृतदेह पाहताच सासुबाईने आरडाओरड करून पळून जाणाऱ्या सुमीतला पकडण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, उपनगर पोलिसांना घटनेची माहिती कळविण्यात आली. त्यांनी तत्काळ तपास करुन सुमीतला अटक केली. शवविच्छेदन करून मृतदेह नातलगांच्या ताब्यात देण्यात आला. मृत गणेशच्या पश्चात एक भाऊ, बहिण, आई- वडील असा असा परिवार असून धाकटा असलेला गणेश नवीन मराठी शाळेत इयत्ता तिसरीत शिक्त होता.

### सुमीत नशेखोर

सुमीत हा नेहमीच मद्य व इतर स्वस्त नशा करुन मोलमजुरीचे पैसे उडवत होता. त्याची पत्नी सारिका ही त्याला मद्यापासून परावृत्त करत होती. तरीही त्याने दुर्लक्ष केले. पतीच्या याच जाचाला कंटाळून तिने आईकडे आश्रय घेतला होता. ती माहेरी राहत असताना तिने मुले पती सुमीतकडे दिली होती. त्यानंतर पत्नीला कायमचा धडा शिकवण्यासाठी सुमीतने रागासह मद्याच्या नशेत मुलगा गणेश याचा गळा आवळून खून केला. गणेश हा जन्मत: दिव्यांग होता. वरिष्ठ निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांच्या सूचनेने सहायक निरीक्षक सुयोग वायकर तपास करत आहेत.

# घरफोड्यांना अटक; ऐवज जप्त

**नाशिकरोड | प्रतिनिधी**

घरफोडी करणाऱ्या दोघा अट्टल चोरट्यांना नाशिकरोड गुन्हे शोधपथकाच्या कर्मचाऱ्यांनी पाठलाग करून शिताफीने अटक केली. त्यांच्याकडून चोरी करण्यात आलेले तीन लाख रुपये किमतीचे सोने हस्तगत करण्यात आले. या चोरट्यानी नाशिक रोड व परिसरात तब्बल चार ठिकाणी घरफोड्या केल्याचे पोलीस तपासात उघडकीस झाले आहे.



सिन्नरफाटा सिटी लिंक रोड परिसरात दोघे संशयास्पदरित्या फिरत आहेत असे समजल्यानंतर नाशिकरोड गुन्हे शोध पथकाचे अजय देशमुख व विशाल कुंवर यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक गिरी यांना माहिती दिली. सपोनि प्रविण सूर्यवंशी व पथकाने तत्काळ सिन्नरफाटा येथे धाव घेतली. सिटी लिंक बस डेपोजवळील रस्त्यावर एका रिक्षाजवळ दोन संशयित व्यक्ती पोलिसांना पाहून पळण्याचा प्रयत्न करताना दिसले. पोलिसांनी पाठलाग करून त्यांना पकडले व त्यांची चौकशी केली. त्यांनी आपली नावे साजिद हसन खान (वय २७, रा. अरिंगळे मळा, साईबाबा मंदिर जवळ, नाशिकरोड) आणि निखील चंद्रकांत पेटारे (वय २५, रा. विहितगाव, नाशिकरोड) अशी असल्याचे सांगितले. त्यांच्याकडून २,८९,००० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने मिळाले ते पोलिसांनी जप्त केले. सर्व घरफोड्यांचा तपास पोलीस हवालदार विजय टेमगर करीत आहेत.

# अंत्यसंस्कार करणाऱ्याची साक्ष नोंदवली

## कापडणीस पिता-पुत्र हत्या; २७ मे स सुनावणी

**नाशिक | प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलसचिव नानासाहेब कापडणीस (७०) व त्यांचा पुत्र अमित कापडणीस (३५) या दुहेरी खून खटल्यात बुधवारी (दि. ३०) मोखाडा येथील साक्षीदाराची साक्ष विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी जाणून घेतली. तर, मोखाडा ग्रामपंचायतीकडे अनोळखी मृतदेह मिळाले वा त्यासंबंधीचे कागदपत्रे व दाखले मिळण्याबाबतचा कार्यवाही सुरु झाली आहे.

जुन्या पंडित कॉलनीमध्ये राहणाऱ्या कापडणीस पिता-पुत्राचा डिसेंबर २०२१ मध्ये पूर्वनियोजित कट रचून खून करण्यात आला होता. खून केल्यानंतर दोघांचे मृतदेह पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने पालघर जिल्ह्यातील मोखाडा परिसरातील निर्जनस्थळी टाकण्यात आले होते. हा गुन्हा उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी मुख्य सूत्रधार संशयित राहुल गौतम जगताप, प्रदीप जगन्नाथ शिरसाठ, विकास हेमके आणि सूरज मोरे यांना अटक केली. या खटल्याची नियमित सुनावणी सुरु आहे. कापडणीस यांच्या मृतदेहावर अनोळखी इसम म्हणून बुधवारी (दि. ३०) मोखाडा पोलिसांनी अंतिम संस्कार करणाऱ्या या साक्षीदाराची साक्ष नोंदवून घेतली. विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम व सरकार पक्षातर्फे सरकारी वकील सचिन गोरवाडकर यांनी ही साक्ष घेतली. तसेच, यावेळी मोखाडा ग्रामपंचायतीला अनोळखी मृतदेहाचा अंत्यसंस्कार केल्यासंदर्भातील दाखल मिळावा. यासाठी पाठपुरावा करण्यात येणार आहे. या सुनावणीस चारही संशयित न्यायालयात उपस्थित होते.

# दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी फिजिओथेरपी शिबिर

**नाशिक | प्रतिनिधी**

मिशन आत्मनिर्भर उपक्रमांतर्गत गट संसाधन केंद्राच्या प्रभावी वापराचा एक सकारात्मक उपक्रम म्हणून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी फिजिओथेरपी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात विद्यार्थ्यांना आणि पालकांना थेरपीविषयी मार्गदर्शन मिळाले.



फिजियोथेरेपी तज्ज्ञ डॉ. शेखर गाडे यांनी विद्यार्थ्यांची तपासणी केली. फिजिओथेरपीसाठी वापरल्या जाणाऱ्या विविध साहित्याची माहिती शिक्षकांना दिली. पालकांनाही थेरपी कशी करावी याचे मार्गदर्शन केले. फक्त उपचार नव्हे तर सातत्यपूर्ण थेरपी, व्यायामाचे महत्त्व आणि संतुलित जीवनशैली कशी ठेवावी याविषयीही माहिती देण्यात आली. गट समन्वयक वंदना चव्हाण यांनीही मार्गदर्शन केले.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून नाशिक जिल्ह्यातील गट संसाधन केंद्राचा प्रभावी वापर करण्यासाठी मिशन आत्मनिर्भर उपक्रमास सुरुवात करण्यात आली. या उपक्रमामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना आवश्यक ते वैद्यकीय व शैक्षणिक मार्गदर्शन एका ठिकाणी मिळाले आहे. पालकांनी समाधान व्यक्त केले. गटविकास अधिकारी भास्कर रेंगडे, गटशिक्षणाधिकारी चंद्रकांत गवळी यांच्या पुढाकारातून गटस्तरावर हा उपक्रम राबवण्यात आला.

# अचानक पडल्याने तिघांचा मृत्यू

**नाशिक | प्रतिनिधी**

शहर परिसरात घडलेल्या तीन घटनांमध्ये तिघांचा उंचावरुन पडल्याने मृत्यू झाला आहे. यात एका युवकासह महिला आणि वृद्धाचा समावेश आहे. याप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये मृत्यूच्या नोंदी करण्यात आल्या आहेत.

जुने नाशिकमधील ६५ वर्षीय सुभद्राबाई रामदास पाटील (रा. पाटील गल्ली, बुधवार पेठ) या १६ तारखेला सकाळी पाचच्या सुमारास राहत्या घरात सोफ्यावरून खाली पडल्या. त्याच्या खुब्याला मार लागल्याने उपचारासाठी आडगाव येथील वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान सोमवारी त्यांचा (दि. २८) मृत्यू झाला. भद्रकाली पोलीस तपास करत आहेत. दुसरी घटना गंगापूर शिवारातील शिवाजीनगरमध्ये घडली. दयाराम उत्तम पाटील (७५, रा. शिंदखेडा, जि. धुळे) हे २५ तारखेला दुपारी चारच्या सुमारास शिवाजीनगर येथे रस्त्याने पायी चालताना पडले. त्यांना डोक्याला मार लागल्याने बेशुद्ध अवस्थेमध्ये त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्या आले असता, सोमवारी (दि. २८) उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. गंगापूर पोलीस तपास करत आहेत, तर तिसरी घटना जुन्या नाशिकमधील कुंभारवाड्यात घडली. अमीतकुमार शिवनाथ पासवान (३०, रा. जुना कुंभारवाडा, जुने नाशिक) हा शनिवारी (दि.२६) रात्री साडेआठच्या सुमारास राहत्या वाड्याच्या पहिल्या मजल्यावरून जिन्यात पाय घसरून पडला. त्याच्या डोक्यासह शरीराला गंभीर दुखापत झाली. उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केले असता, मंगळवारी (दि.२९) उपचारदरम्यान त्याचा मृत्यू झाला. भद्रकाली पोलीस तपास करीत आहेत.

# ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा आज कृतज्ञता सन्मान

**नाशिक | प्रतिनिधी**

आंबेडकरी विचारधारेशी बांधिलकी सांगणार्या व ज्वलंत सामाजिक प्रश्नांवर लढे उभारणार्या, आंबेडकरी चळवळीला प्राधान्य देउन प्रसिद्धीपासून अलिप्त राहिलेल्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा कृतज्ञता सन्मान गुरुवारी (दि. १)सायंकाळी सहा वाजता परशुराम साईखेडकर नाट्यगृह येथे होणार आहे.

सोहळ्यास ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे प्रमुख वक्ते आहेत. ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत अभ्यासक प्रा. सुकुमार कांबळे अध्यक्षस्थानी असतील. कृतज्ञता सन्मान सोहळ्याचे हे दुसरे वर्ष असून अत्यंत अनोख्या व आंबेडकरी चळवळीमध्ये ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य झोकुन दिलें अशा अशोक दिवे , साराभाई वेळूंजकर, डॉ. भरत कारिया , विश्वनाथ काळे, दीपचंद दोंदे , उल्हास डांगळे , प्रताप काळे, विवेक गायकवाड, अरुण मोरे या मान्यवरांचा तर मरणोत्तर सन्मानामध्ये दिवंगत बाळासाहेब तिगोटे , शंकरराव काकळीज, भिराज जाधव, श्याम काळे, मदन शिंदे आणि बबन जाधव यांचा कृतद्यनता सन्मान करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे आयोजन सत्याग्रह भूमी प्रतिष्ठान, मोठा राजवाडा, नाशिक यांनी केले असून शहरातील विविध सामाजिक कार्यकर्ते, संघटना व प्रतिष्ठित व्यक्तींनी संयोजनात सक्रिय सहभाग घेतला आहे. संयोजनात नितीन काळे, शरद काळे , केदारे , संजय तेजाळे , रविकिरण जाधव, धनंजय काळे, राजू भालेराव , गौतम निकम, दिलीप लिंगायत, विजय बागुल , अजय काळे, मंगल डांगळे व अविनाश तेजाळे यांचा समावेश आहे.

## वाहनचोरी थांबेना

**नाशिक |** शहर परिसरात दुचाकी चोरीचे सत्र सुरुच असून, पुन्हा पाच वाहनांची चोरी झाली आहे. गोपाळ सुखदेव कांबळे (रा. राऊ हॉटेलजवळ, पेठरोड) यांची ४० हजारांची दुचाकी सोमवारी (दि.२८) मध्यरात्री घराच्या समोर पार्क असताना अज्ञात चोरट्याने चोरून नेली. म्हसरुळ पोलिसात गुन्हा दाखल आहे. तर, मोइनुद्दीन फकिर मोहम्मद शेख (रा. काझीपुरा, भद्रकाली) यांची ९ हजारांची मोपेड २५ तारखेला मध्यरात्री घरासमोरून चोरट्याने चोरून नेली. नाजीम अहमद आमीर शेख (रा. हुसेन चौक, पिंजार घाट रोड, भद्रकाली) यांची १० हजारांची दुचाकी २४ तारखेला मध्यरात्री घरासमोरून चोरट्याने चोरून नेली. भद्रकाली पोलिसात गुन्हा दाखल झाले आहेत. तसेच संतोष खंडू दळवी (रा. संजीवनगर, अंबड लिंकरोड, अंबड) यांची ६० हजारांची दुचाकी राहत्या घरासमोर पार्क असता २३ तारखेला मध्यरात्री चोरट्याने चोरून नेली. अंबड पोलिसात गुन्हा दाखल आहे. गणेश नवनाथ पवार (रा. अशोकनगर, सातपूर) यांची ५० हजारांची दुचाकी २६ तारखेला मध्यरात्री राहत्या घरासमोर पार्क असता अज्ञात चोरट्याने चोरून नेली. सातपूर पोलिसात गुन्हा दाखल आहे.

## आडगाव शिवारात घरफोडी

**नाशिक |** आडगाव शिवारातील निवृत्तीनगरमधये बंद अपार्टमेंटचे लॅच लॉक तोडून चोरट्यांनी घरफोडी केली. अमृत सुरेश तांबारे (३०, रा. निवृत्तीनगर, आडगाव शिवार) यांच्या फिर्यादीनुसार, ते राहत असलेल्या वक्रतुण्ड अपार्टमेंटमध्ये सोमवारी (दि. २८) सकाळी अकरा ते रात्री आठ या दरम्यान चोरट्यांनी बंद फ्लॅटच्या सेफ्टी दरवाजाचे लॅच लॉक तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी घरातून १ लाख ५० हजारांच्या रोकडसह १५ हजारांचे सोन्याचे मंगळसूत्र, सहा हजारांचे कानातील दागिने असा १ लाख ७१ हजारांचा ऐवज चोरून नेत घरफोडी केली.

## कारमधील साहित्याची चोरी

**नाशिक |** पंचवटीतील हनुमाननगर परिसरातून कारमधून साहित्य चोरून नेले. विवेक विजय पंडित (५४, रा. हनुमाननगर, पंचवटी) यांच्या फिर्यादीनुसार, शनिवार (दि. २६) ते मंगळवार (दि. २९) या दरम्यान त्यांची नॅनो कार (एमएच १५ इबी १२८७) घराच्या पार्किंगमध्ये पार्क असता, अज्ञात चोरट्यांनी कारचा दरवाजा कशानेतरी उघडला. कारमधून २५ हजारांचे माती परीक्षण यंत्र, दीड हजारांचे वायर बंडल आणि ५० रुपयांची घन असा २६ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. आडगाव पोलिसात चोरीचा गुन्हा दाखल आहे.

## सोन्याची पोत ओरबाडली

**नाशिक |** मारहाण केल्याची कुरापत काढून संशयिताने महिलेला मारण्यासाठी कोयता उगारला असता, महिलेने प्रसंगावधान राखत त्यास ढकलले. त्यावेळी त्याने महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत ओढून तो पळून गेला. बिटू गायकवाड (रा. समतानगर) असे संशयिताचे नाव आहे. मंगल दत्तू बस्ते (४२, रा. आगरटाकळी, समतानगर) यांच्या फिर्यादीनुसार, मंगळवारी (ता.२९) आंबेडकरनगर येथे त्यांनी टरबूज विक्रीचे दुकान लावले असता त्याठिकाणी संशयित बिटू आला आणि त्याने, तुमच्या मुलाने मला शिवीगाळ केली अशी कुरापत काढून त्याच्या हातातील कोयता त्याने मंगल यांना मारण्यासाठी उगारला असता, त्यांनी त्यास ढकलले. त्यावेळी त्याच्या गळ्यातील १२ हजारांचे सोन्याचे मंगळसूत्र त्याच्या हातात गेले. त्याने ते ओढून दुचाकीवरून पळून गेला. त्यानंतर त्याने पूनम आहिरे यांच्या घरी गेला आणि तुमचा मुलगा कोठे आहे असे विचारले. त्यांनी घरी नसल्याचे सांगितल्याने त्यांनाही शिवीगाळ केली.

## कोयताधारी ताब्यात


**नाशिक |** म्हसरुळ येथून एकाला कोयत्यासह अटक केली. रितेश भाऊसाहेब चव्हाण (२३, रा. अश्वमेघनगर, पेठरोड) असे संशयिताचे नाव आहे. बजाज शोरुमजवळ तो कोयता बाळगून वावरत असल्याची खबर मिळताच म्हसरुळ पोलिसांनी त्यास सोमवारी (ता.२८) रात्री सव्वा दहाच्या सुमारास अटक केली. म्हसरुळ पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

## निधन वार्ता...



### प्रदीप जोशी

**नवीन नाशिक |** भविष्य निर्वाह निधी कार्यालयातील निवृत्त वर्ग २ अधिकारी प्रदीप जोशी (६३) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, नातू असा परिवार आहे. देशदूत डिजिटलचे उपसंपादक मानस जोशी यांचे ते वडील होत.



### निवृत्ती जुन्नरे

**नाशिकरोड |** जेलरोड येथील सेवानिवृत्त प्राथमिक मुख्याध्यापक निवृत्ती बाबुराव जुन्नरे ( ९५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, मुलगी, जावई, सुना, नातवंडे, पणतू असा परिवार आहे. सुनिल व शेखर जुन्नरे यांचे ते वडील होत.


# क्लासिफाईड /सुपरमार्केट

### पाहिजेत

**पंचवटीत** कापड दुकानाकरिता पंचवटीतील स्थानिक मुले पाहिजेत. सकाळी ९ ते १ - 7588664491. (28-04-CM-80)

### फ्लॅट विकणे

**साक्रीकर** संकुल, कानडे मारुती लेन येथे 1BHK, २रा व ३रा मजला, 1200 स्के.फूट ड्युप्लेक्स फ्लॅट विकणे आहे. मो. 9322221565. (BK-633)

### दारुबंदीचा गुरुमंत्र

**द ग्रेट** साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करू... पेशंटला सांगा...।। नका सांगू... पेशंटला आणा... ।। नका आणू... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासून १०० टक्के मुक्ती... सर्व सुविधांनी परिपूर्ण : * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर संपर्क : 9552619752. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (09/01/26) (CRINV-23-24JL/ CRG00555)

### व्यसनमुक्ती

**गॅरंटीने** सोडवा. दारू + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखू + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. मो. 9552619752. www. drpalvenasha muktikendra.in, १००% रिझल्ट. (09/01/26) (CRINV-23-24JL CRG00554)

### सर्व आजारांसाठी

**जुनाट** सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे, जुनाट संधीवात/चिकन गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मूळव्याध, एचआयव्ही, भूक लागत नाही? वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा- अहमदनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर पालवे, वरणगाव. मो.नं. 9552619752.

### वाहन विषयक

**विकणे आहे-** ट्रक्स-टँकर विकणे आहे. मॉडेल:२०१७ ते २०२२ कंपनी: टाटा, लीलेंड, बेंझ, स्टील टँकर आणि एम.एस. टँकर सहित किंवा टँकर विना १२ टायर व १४ टायर विकणे आहे. मोबाईल ९८२२१०९५०४/ ९८२२१३१३०० जीतसन्स ग्रुप ऑफ कंपनीस श्रीरामपूर (04/05/25-25297)

**विकणे आहे-** ट्रक्स-टँकर विकणे आहे. मॉडेल:२०१७ ते २०२२ कंपनी: टाटा, लीलेंड, बेंझ, स्टील टँकर आणि एम.एस. टँकर सहित किंवा टँकर विना १२ टायर व १४ टायर विकणे आहे. मोबाईल ९८२२१०९५०४/ ९८२२१३१३०० जीतसन्स ग्रुप ऑफ कंपनीस श्रीरामपूर (04/05/25-25298)

### नावात बदल

**माझे** लग्नापूर्वीचे नाव सुनंदा शिवाजी आगळे असे होते. आता लग्नानंतर माझे नाव सुजाता किशोर घोटेकर असे झाले आहे. वरील दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच आहे. प्रतिज्ञापत्र क्र. 35AB 366143. २६/०४/२०२५ नुसार. (Bk- 819/01/05)

**I** have changed my NAME. My OLD NAME was MRUNALINI. Now my NEW NAME is SAWANT MRUNALINI as per Aadhar no 311183400058 (Cm-821/01/05)

**My** Old Name Sheetal Rajendra Indani has changed to new name Sheetal Pritam Bagul. Aadhar card No. 7738 26472096. (Bk-820/01/05)

- जाहिरात दर -
◆ क्लासिफाईड डिस्प्ले रु. ६६/- प्रति स्क्येअर सेमीसेंटर (कॉलम साईज ३.३ सें.मी.) ◆ ४० शब्दापर्यंतच्या छोट्या जाहिराती रु. १५/- प्रतिशब्द ◆ ३+१ फ्री ◆ क्लासिफाईड डिस्प्ले ३+१ फ्री ◆ कमीत कमी शब्दमर्यादा १० शब्द ◆ हायलाईट बॉक्स रु. १५०/- मात्र (प्रति दिवस) ◆ पोस्ट बॉक्स रु. ३००/- मात्र.

### वाचकांना विनम्र सूचना

'देशदूत' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची देशदूत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल देशदूत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

टीप : बाळाचा फोटो प्रकाशित करण्यासाठी रु. १००/- शुल्क आकारले जाईल.

या सदरात केवळ १ ते ५ वर्षादरम्यानच्या बाळाचेच फोटो प्रकाशित केले जातील.

◆ **जाहिरात विभाग,** दै.देशदूत, एम.जी.रोड, नाशिक. ०२५३- २५७५७१६ ◆**नाशिकरोड** : प्रतिक आर्केड, शॉप नं. २५, देना बँकेच्या वरती, बिटको पॉईंट. ०२५३-२४६२७५६ ◆ **निफाड** : मार्केट कमेटी, व्यापारी संकुल, बसस्टॅण्डशेजारी, गोदावरी प्रिंटींग प्रेसच्या वरती. ०२५५०-२४११०० ◆**दिंडोरी** : दिंडोरी कृ.उ.बा. समिती कॉम्प्लेक्स, पंचायत समिती गेटसमोर. ०२५५७-२२२८८८ ◆ **मालेगांव** : पांजरपोळ शॉपिंग सेंटर, छ.शिवाजी पुतळयाजवळ. ०२५५४-२४३४६२२ ◆**सिन्नर** : दुसरा मजला, मोतीकमल टॉवर, बसस्थानकासमोर. ०२५५१-२२२१५१. या कार्यालयांमध्ये बाळाचे फोटो स्विकारले जातील.